# राशिभविष्य - जून, २०२३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

===========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रासाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे,व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

===========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु -हर्षल- राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील व तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखक मंडळींना यशदायक होईल. शासकीय नोकरीत असणारांपैकी कोणास एखादे अधिकार-पद मिळणेही संभवते. पण येथील राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय त्याच्यामुळे अपमान होणेही संभवते. तसे झाल्यास मनात डूख धराल व नको ते घडेल. जपा. येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल,लहरी होईल. कोणाचा धाक किंवा दडपण सहन होणार नाही. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड, खट्याळ होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत जात आहे. तसेच येथील बुधही महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व सर्व सुखाचे असेच घडेल. बुध ग्रह मात्र संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, शत्रुत्व निर्माण होणे, शत्रुभय असणे संभवते. पण त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडणे संभवते. कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. . जपा. पण येथील शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळेल. शिवाय शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे आर्थिक स्थिती सुधारेल; पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मानसिक

व्यग्रता, नैराश्य येणे संभवते. पण तो गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः::" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात व बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामळे अनारोग्य, मनस्ताप, थकवा येणे मनस्थिती चंचल होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक चिंताही त्रस्त करतील. जपा. बुधामुळे कुसंगतीची बाधा होण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी घडेल, प्रवास योग येणेही संभवते. शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, सर्व ठिकाणी सहकार्य लाभेल व मनस्थिती उदार होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अविस्मरणीय घटना घडणे संभवते. शिवाय तो लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांपासून नुकसान होणे संभवते. अशा सर्व कारणांनी नैराश्य येणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते; पण शैक्षणिक दृष्ट्या दिखाऊ आचरण होणेही संभवते. येथील हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. शिवाय तो अपघातकारक होणेही संभवते. येथील गुरु अध्यात्म, समाजसेवा कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, प्रवासात अडचणी येण्याची शक्यताही जाणवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:"

तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. तसेच बुधही महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम {लग्न} स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल, शरीरपीडा, मानभंग होणे, अनारोग्य होणे, मनस्ताप होणे, मनस्थिती अस्थिर, चंचल होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, धननाश होणे, काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे, संभवते. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे उष्णता विकाराचे अनारोग्य होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, संभवते. पण येथील शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व धनलाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता जाणवते. तसेच अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. तसेच तो कायदा, तत्त्वज्ञान, अशा उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल; पण तो मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गे धनलाभ होणेही संभवते. विवाहेच्छूना विवाहयोग येईल, व या राशीच्या विद्यार्थ्यांना सहज शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे मित्र मिळतील. राहू बौद्धिक दृष्ट्या अनुकुल असला तरी ज्यांच्याकडे अधिकार पद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा लोभ प्रबळ होईल. त्यांनी मनावर ताबा ठेवून तसा प्रयत्न करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. हर्षलमुळे काय घडेल ते निश्चितपणे सांगता येणे कठीण दिसते. पण त्याच्यामुळे अर्थलाभ होणे, मित्रांशी भांडणे होणे मात्र संभवते. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची व दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून, श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेत. पैकी मंगळामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार होतील व त्यामुळे अकारण श्रम, दगदग कराल व शरीरपीडा होईल. पण शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो अपघातभयकारक आहे. जपा. काही मंडळींना विचित्र आजार होणे संभवते. त्याशिवाय तो दु:खकारक असून दैन्य देणाराही आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो शुभ असल्यामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु व हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होतील. राहूही नोकरदार मंडळींना लाभदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना अधिकार पद मिळेल, तर काही मंडळींचा सन्मान होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक १४ व २४ रोजी या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परीस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील व त्यांच्यामुळे सुखसमाधान, मित्रलाभ व धनलाभ होणे संभवते. तसेच आरोग्य उत्तम राहील व नोकरी-व्यवसायात प्रगती करणे शक्य होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे शरीरपीडा, दगदग, मानभंग होणे संभवते. शिवाय अनारोग्य होणे, नियोजित कार्यात अपयश येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. पण तो मानसिक दु:खदायक असल्यामुळे मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करावी. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील. पण विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू

नका. तसेच उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे
अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. त्यामुळे सद्गुणांची वाढ होईल व काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळू शकेल. प्रवास योग येणेही संभवते. हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना आपल्या संशोधन कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. येथील राहू फिरती नोकरी असणारांना अनुकुल होईल. नोकरदार मंडळींच्या अंगी सभाधीटपणा येईल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक १४ व २४ रोजी या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायकच होतील. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व धनलाभ व मित्रलाभ होईल, व काही मंडळींना सामाजिक दर्जा प्राप्त होईल. कीर्ती-प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या व्यय स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ पूर्णपणे प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे, मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, अनारोग्य होणे संभवते. पण शुक्रामुळे चैन, ऐषाराम,क्षणिक सुख मिळू शकेल व प्रतिकुल परिस्थिती सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर श्री विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:"तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात शत्रुत्व निर्माण होणे संभवते. गैरसमजुतीमुळे वाद, भांडणे होतील, अनारोग्य होणेही संभवते. पण तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. येथील हर्षल अपघातकारक असल्यामुळे सर्व ठिकाणी सतत सावधानतेने आचरण करणेच अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह

महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात हे दोनही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य,मानसिक ताण, भय, वडील मंडळींचा विरोध, भांडणे होणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात ते दोन्ही ग्रह अनुकुल होतील व काही मंडळींना आर्थिक, सामाजिक दर्जा प्राप्त होईल. मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होईल. या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे कष्ट-परिश्रमानेच अर्थलाभ होईल. शिवाय मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:' तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सुखदायक असला तरी त्याच्यामुळे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन सावधानतेने चालवा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनि असून तो चिकाटीचा गुण देत असल्यामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण त्याच्यामुळे स्वभाव संशयी, स्वार्थी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता अस्वस्थ करतील. तसेच काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे जुने प्रेमसंबंध दृढ होतील, काही विवाहेच्छूंना विवाहयोग येईल, प्रवास योग येईल व आर्थिक लाभ होतील. राहूमुळे मनात कपटी विचार येतील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. येथील हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारी व्यवसायात भागीदारीत बाधा येणे संभवते. या राशीच्याअष्टम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, मानसिक ताण सहन करावा लागेल. शिवाय इच्छा अपूर्ण राहतील, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. संततिसुखात बाधा येणे संभवते. बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश लाभेल व सुख लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात भांडणे होतील, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई निर्माण होतील. या राशीच्या दशम स्थानी कर्क

राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे नोकरीव्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता जाणवते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. येथील शुक्रही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख सहन करावे लागेल. श्रद्धा असेल तर "शिवोपासना " व "हनुमान उपासना" अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. तसे घडल्यास नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत गुरु -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे आरोग्य सुधारेल व सुख लाभेल. राहू अनारोग्यकारक होणे संभवते. पण ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना अशा संबंधामुळे व्यवसायात लाभ होतील. पण येथील हर्षलमुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकार होणे संभवते. सबब सतत अति खोल विचार करत बसू नका. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. पण तो महिन्याच्या पूर्वार्धात केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे दु:ख होणे, भांडणे होणे, वियोग होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश व सुख लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. पण शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा सुसंगती प्राप्त होईल व सुख लाभेल. तसेच काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी " हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज

सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु-** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळेल व काही मंडळींना आवडते उत्तम कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी राहू-गुरु-हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. पण येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच येथील गुरुही अनुकुल, प्रगतिकारक व सुखदायक व आर्थिक लाभदायकही होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील व येथील रवि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील; पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. बुधामुळे कार्यसिद्धी होईल, कीर्ती लाभेल व धनलाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि केंद्रस्थानी जात असल्याने भाग्योदयकारक होऊ शकेल. पण बुधामुळे वाद, भांडणे, दु:ख होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ अनारोग्यकारक होईल, त्याच्यामुळे हाडमोड होणेही संभवते. अकारण कष्ट-परिश्रम होतील. तसेच तो जलभयकारक व विषभयकारक होणेही संभवते. जपा. त्यामुळे नैराश्य येईल. पण शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण हा शुक्र वृद्ध मंडळींना प्रतिकुलच होईल. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे काही मंडळींना खूप प्रवासयोग येतील, सुखोपभोग प्राप्त होईल, यश लाभेल व आर्थिक लाभही होतील. श्रद्धा असेल तर “गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना” अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. त्याशिवाय आर्थिक संकटे येणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू-गुरु-हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे कौटुंबिक त्रास, अनिष्ट घटना मनस्ताप देतील. हर्षलमुळे आहे त्या परिस्थितीत कशातही सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. केवळ येथील गुरुमुळे कौटुंबिक सुख समाधान लाभेल व काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होतील व रविमुळे अनारोग्य होणे संभवते. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. प्रिय जनांपैकी कोणाच्या दूरत्वासमुळे मन अस्वस्थ राहील. नोकरीत . वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. बुधामुळे संतती-स्त्रीपासून त्रास सहन करावा लागेलसे दिसते. मंद बुद्धी होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल,धनलाभ होणे संभवते. क्वचित कोणास कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही शक्य दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, पतिपत्नीत होणारे वाद, भांडणे, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनीही संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा निर्माण येणार नाही याची काळजी घ्यावी. पण येथील शुक्रामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह संपन्न होतील व विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून तो नोकरदार मंडळींना प्रतिकुल होईल. श्रद्धा असेल तर “शिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:”:तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम

विष्णवे नमः:"  तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य, कुटुंबातील प्रियजनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू-हर्षल-गुरु असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. पण त्याच्यामुळे हातून काही कर्तृत्व घडेल. येथील हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती व आकलनशक्ती .प्राप्त होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. येथील गुरु बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल.  त्याच्यामुळे काहीजणांना प्रवासयोग येणेही संभवते.पण त्याच्यामुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे  अनारोग्य, अपघात, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, प्रियजनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, संततीपैकी कोणाचे आजारपण, अशापैकी कारणांनी असह्य दु:ख होईल व नैराश्य येईल. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल; पण आर्थिक नुकसान होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात त्याच्यामुळे संतती-स्त्रीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे अनारोग्य, इजा होणे, अंगावर फोड येणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच येथील शुक्र सर्व प्रकारच्या क्लालारांना  अनुकुल असला तरी त्यांना आपले कलागुण प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या भाग्यसथानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे हातून दिखाऊ, ढोंगी आचरण  घडेल.  तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते.  श्रद्धा असेल तर शिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल होणे संभवते. मानसिक संवेदना अति जलद होतील, मन उदास होईल व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून राहूमुळे कौटुंबिक कलह,आर्थिक समस्या त्रस्त करतील. हर्षलमुळे मन व बुद्धी अस्थिर,चंचल, लहरी होईल त्यामुळे अविचाराने नको इतका खर्च कराल.तसेच आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अकारण अपमान होत आहे हेही समजणार नाही. पण येथील गुरु अनुकुल असल्याने कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यवसायात प्रगती होईल व आर्थिक लाभही होतील. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता, अनारोग्य, दु:ख, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास अशापैकी घटना घडणे संभवते. येथील बुधामुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल. पण त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे, शत्रुभय असणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे अनारोग्य होणे, स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करणे, मुलांचे मनाविरुद्ध वागणे अशापैकी घटना घडणे संभवते. शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, वैवाहिक जीवनातील आणि कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे संकटपरंपराच कोसळण्याची शक्यता जाणवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ,मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====०००००0०००००=====